# <u>नियमित दिवाणी दावा क्र. १६१/२०२६</u>

श्री. जयवंत दत्तु थोरात व अन्य विाा श्री.रामदास शंकर टोमके व इतर

CNR No.- MHST070022162026.

## <u>निशाणी क्र. २३ वरील आदेश</u>

०१. प्रस्तुत अर्ज विलंब माफ होवून प्रतिवादी क्र. ५ यांची कैफियत स्विकारणेबाबत दाखल केला आहे. संबंधीत प्रतिवादीचे कथन आहे की, प्रस्तुत प्रकरणी प्रतिवादी क. ५ यांना नि.क्र.१० वरील अहवालानुसार दि.०६/०६/२०२६ रोजी समन्स बजावणी झाली आहे. संबंधित प्रतिवादी हे निरक्षर असुन वयोवृध्द आहेत. त्यांना कायद्याचे ज्ञान नाही. त्यामुळे विहीत मुदतीत वकीलांची नेमणुक करुन, उपस्थित राहुन कैफियत दाखल करु शकले नाहीत. सबब, संबंधीत प्रतिवादी क्र. ५ यांनी प्रस्तुतचा अर्ज मंजूर करून विलंब माफ करून त्यांची कैफियत स्विकारणेबाबत विनंती केली आहे.

०२. वादींच्या वतीने सदर अर्जाच्या मागील पृष्ठावर म्हणणे दाखल करुन आक्षेप नोंदविला आहे व अर्ज नामंजूर करणेबाबत विनंती केली आहे.

०३. अभिलेखावरील कागदपत्रांचे अवलोकन केले. उभयपक्षांतर्फे विद्वान विधिज्ञांचा युक्तिवाद ऐकला.

०४. प्रस्तुत अर्ज, म्हणणे व अभिलेखावरील कागदपत्रांचे अवलोकन करता पुढील वादप्रश्न विचारार्थ उपस्थित झाले. त्यावरील निष्कर्ष कारणमिमांसेसह खालीलप्रमाणे नोंदिवण्यात येत आहेत;

| **अ.क्र.** | **वादप्रश्न** | **निष्कर्ष** |
|---|---|---|
| १) | अर्ज मंजूर होण्यास पात्र आहे काय ? | **होकारार्थी** |
| २) | आदेश काय ? | **अर्ज मंजूर करण्यात येतो...** |

## <u>कारणमिमांसा</u>

**<u>वादप्रश्न क्र.१ करीता</u> :-**

०५. अभिलेखाचा विचार करता, प्रस्तुत दावा निरंतर ताकीदीकरिता आहे. दावा

मिळकत स्थावर मालमत्ता आहे. अभिलेखाचे अवलोकन करता, प्रतिवादी क्र.५ यांना नि.क्र.१० वरील बेलिफ अहवाल नुसार दि.०६/०६/२०२६ रोजी प्रस्तुत दाव्याचे समन्स बजावणी झाल्याचे स्पष्ट होते. त्यानंतर नेमलेल्या तारखेस म्हणजेच दि.०९/०६/२०२६ रोजी ते न्यायालयासमक्ष उपस्थित राहिले नाहीत व कैफियत दाखल केली नाही. त्यानंतर, संबंधित प्रतिवादी क्र. ५ यांनी आजरोजी प्रस्तुत अर्ज दाखल केला आहे.

०६. अभिलेखाचे अवलोकन करता संबंधीत प्रतिवादीस नि.क्र.१० वरील बेलिफ अहवाल नुसार दि.०६/०६/२०२६ रोजी दाव्याचे समन्स बजावणी झाल्यानंतर नेमलेली तारीख ०९/०६/२०२६ होती. आजरोजी म्हणजेच दि.०४/०८/२०२६ रोजी प्रस्तुत अर्ज दाखल केला आहे. सबब, सदर कालावधी मध्ये सुमारे ०२ महिन्यांचा विलंब झाला आहे. वादपत्रामध्ये संबंधित प्रतिवादी क्र.५ यांचे वय सुमारे ७० वर्षे नमूद आहे. त्यावरून अर्जातील कथनांमध्ये तथ्य दिसून येते. त्यामुळे अर्जातील कथनांवर अविश्वास ठेवण्याचे कारण नाही. प्रस्तुत दावा निरंतर ताकिदीकरिता आहे. त्यामुळे, मी या मतास आलो आहे की, अर्जात नमुद कारण विलंब माफ करणेस पुरेसे आहे. वादाचे स्वरूप पाहता, उभय पक्षकारांमधील वादग्रस्त असलेला खराखुरा प्रश्न निर्णित होणे आवश्यक आहे. त्याकरीता, उभय पक्षकारांची वादकथने अभिलेखावर दाखल असणे जरूरीचे आहे. अर्ज मंजूर केल्यास वादींचे काही एक नुकसान होणार नाही, तसेच वादाचे निवारण दुतर्फा गुणदोषावर होणार आहे. या उलट, अर्ज नामंजूर झाल्यास संबंधीत प्रतिवादीस नैसर्गीक न्यायतत्व नाकारले जावून प्रकरणांची गुंतागुंत वाढण्याची शक्यता आहे. त्यामुळे मी या मतास आहे की, अर्ज मंजूर होणेस पात्र आहे. सबब, वादप्रश्न क्र.१ चा निष्कर्ष होकारार्थी नोंदवीला आहे.

**<u>वादप्रश्न क्र.२ करीता</u> :-**

०७. उपरोक्त उहापोह विचारात घेता अर्ज मंजूर होणेस पात्र आहे. अर्जात नमुद कारण विलंब माफ करणेस पुरेसे आहे. तथापि, दि.०९/०६/२०२६ ते प्रस्तुत अर्ज दाखल दि.०४/०८/२०२६ या एकूण ०२ महिन्यांच्या कालावधीमध्ये संबंधीत प्रतिवादी क्र.५ यांनी उपस्थित होवुन कैफियत दाखल करणेस विलंब केला आहे. त्यामुळे, वादाचे स्वरूप विचारात घेता, मी या मतास आहे की, संबंधीत प्रतिवादीवर वाजवी खर्च एकूण २ महिन्यांकरीता प्रतिमाह करीता रक्कम रू.१००/-बसवणे न्यायाचे व योग्य आहे. सबब, मी न्यायाच्या दृष्टीने पुढील आदेश करीत आहे;

**जयवंत थोरात व अन्य विाा रामदास टोमके व इतर.**

**नियमित दिवाणी दावा क्र. १६१/२०२६.**
**(निशाणी क्र.२३)**

**<u>आदेश</u>**

१) संबंधीत प्रतिवादीचा विलंब माफ होवून त्यांची कैफियत स्विकारणेबाबतचा अर्ज नि.क्र.२३, संबंधीत प्रतिवादी क्र. ५ वर खर्च रक्कम रू. २००/- बसवून मंजूर करण्यात येतो.

२) संबंधीत प्रतिवादीने खर्चाची रक्कम पुढील तारखेस अगर तो पर्यंत वादींस देववावी.

३) संबंधीत प्रतिवादीने आदेशाची पुर्तता केल्यास, त्यांची कैफियत अभिलेखावर स्विकारण्यात यावी.

(आदेश खुल्या न्यायालयात घोषित केला.)

DISTRICT COURTS MAHARASHTRA

Digitally signed by UTPAT ATUL ARUN
Date: 2026.08.04 17:27:12 +0530

(अ.अ. उत्पात)

दिनांक :- ०४/०८/२०२६.

४ थे सह दिवाणी न्यायाधीश, क.स्तर,
कराड, जि.सातारा.